संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# निसर्गापेक्षा मानवी आपत्तीचाच जास्त धोका

**दरवर्षी** जगात १ मार्च हा दिवस जागतिक नागरीक संरक्षण दिन म्हणून पाळला जातो. १९७२ पासून त्याची सुरुवात झाली. म्हणजे जवळपास गेली पन्नास वर्षांपेक्षा जास्त काळ हा नागरी संरक्षण दिन पाळला जातो. तो साजरा करण्यामागचा उद्देश हाच होता की नैसर्गिक आपत्ती आणि मनुष्यनिर्मित संकटांपासून समाजाचे संरक्षण व्हावे म्हणजेच येणाऱ्या कोणत्याही आपत्तीच्यावेळी सजग आणि सतर्क राहणे हे जितके गरजेचे आहे, तितकेच आपत्ती येणार नाही किंवा आलेल्या आपत्तींपासून तातडीने सर्वांचे संरक्षण करता यावे याकरीता जागृती निर्माण करण्याचे निमित्त म्हणून या दिवसाचे महत्त्व सांगितले जाते. आत्तापर्यंत नैसर्गिक आपत्तीमध्ये भूकंप, वादळ, अतिवृष्टी, यासारख्या संकटांचा समावेश होत होता. परंतु गेल्या वीस-पंचवीस वर्षांत हवामानामध्ये प्रचंड बदल होत गेला. विज्ञान तंत्रज्ञानाने इतकी प्रचंड झेप घेतली की, पर्यावरणात सतत होणारे बदल हे नव्या नैसर्गिक आपत्तीला जन्म देणारे ठरले तर विज्ञान तंत्रज्ञानाच्या वेगवेगळ्या शोधांनी सुखसोयींबरोबर मानवनिर्मित आपत्तीही निर्माण केली आहे. किंबहुना गेल्या वीस-पंचवीस वर्षांत जगभरात वेगवेगळ्या ठिकाणी निर्माण झालेल्या आपत्ती किंवा संकटांचा विचार केला तर नैसर्गिक आपत्तीपेक्षाही मानवनिर्मित आपत्तीपासूनच माणसाला सर्वाधिक धोका असल्याचे म्हणण्याची वेळ येते. नैसर्गिक कारणांमुळे अनेक ठिकाणी भूकंप होतात. अगदी तुफान बर्फवृष्टी किंवा अतिवृष्टी, चक्रीवादळ किंवा मोठमोठे वणवे पसरण्याच्या धोक्यापासून ज्वालामुखीसारखे प्रकारही घडत असतात. जगभरात वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारचे हवामान किंवा ऋतूमान असते. तिथल्या भौगोलिक परिस्थितीनुसार नैसर्गिक आपत्तींचे प्रकारही वेगवेगळे असतात. परंतु भारतासारख्या एकाअर्थी संतुलित हवामान असलेल्या देशातसुद्धा पर्यावरणातून काही नवी संकटं निर्माण झालेली दिसून येतात. ज्यामध्ये तापमानाचे वाढलेले प्रमाण आणि अवकाळी पावसाचा गेल्या काही वर्षातला भडीमार बरेच मोठे नुकसान करणाराही ठरला आहे. भारतात भूकंपाचे प्रमाण जरी कमी असले तरी वर्षाकाठी होणारी दोन-तीन चक्रीवादळं सोडली तर पावसाळ्यात मात्र अतिवृष्टी आणि महापुरातून बऱ्यापैकी तडाखा बसत असतो.

### आपत्ती व्यवस्थापनाची गरज

या सगळ्या नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्याकरीता सरकारतर्फे आपत्ती व्यवस्थापन विभाग सुरू झाला. साधारणपणे तीस वर्षांपूर्वी गुजरातच्या भूज भागात झालेला सर्वात मोठा भूकंप आपत्ती व्यवस्थापनाची आवश्यकता सिद्ध करणारा ठरला. त्यापूर्वी महाराष्ट्रात मराठवाड्यात झालेला भूकंप अनेकांचे बळी घेणारा ठरला होता. परंतु या दोन्ही आपत्तींच्यावेळी स्वतंत्र आपत्ती व्यवस्थापन हा प्रकारच अस्तित्वात नसल्याने त्याची मोठी किंमत मोजावी लागली होती. अर्थात भूकंपासारखी आपत्ती ही खूप अचानकपणे येते. हवामानाच्या अंदाजाप्रमाणे अतिवृष्टी किंवा चक्रीवादळाची पूर्वसूचना काही प्रमाणात मिळते आणि सावधगिरीची उपाययोजना करताही येते. तसे भूकंपाच्याबाबतीत अजून होऊ शकलेले नाही. परंतु जर आपत्ती व्यवस्थापन असेल तर पुरेशा प्रमाणात सावधगिरीचे उपाय करता येतात आणि विशेषतः लोकांचे जीव वाचवता येतात. अलिकडच्या काळात हवामानातला बदल आणि पर्यावरणाच्या संरक्षणाचे उभे राहिलेले संकट तितकेच गंभीर स्वरूपाचे ठरले आहे. यातली वस्तुस्थिती अशी आहे की, वाढते तापमान हा पूर्णपणे नैसर्गिक आपत्तीचा भाग म्हणता येत नाही. ज्याला जगभरातले औद्योगिकरण वेगवेगळ्या विकासाच्या योजना, बेसुमार जंगलतोड, भयानक स्वरूपाची वाहनसंख्येतली वाढ, प्रदूषण निर्माण करणारी कारखानदारी अशा एक ना अनेक कारणांमुळे पर्यावरणाचे संकट अधिक गंभीर झालेले आहे. म्हणजेच ते जितके निसर्गनिर्मित आहे, तितकेच मानवनिर्मितही ठरते. आजच्या या नागरी संरक्षण दिनाच्यानिमित्ताने लोकांच्या संरक्षणाचा विचार करायचा असेल तर नैसर्गिक आपत्तीपेक्षाही मानवनिर्मित आपत्तींचा सामना हा अधिक महत्त्वाचा ठरतो. विशेषतः विज्ञान तंत्रज्ञानाच्या प्रगतीतून मानवाच्या अस्तित्वापुढे केव्हा कसे गंभीर संकट निर्माण होईल हे सांगता येत नाही. अगदी जगभर थैमान घालणारी कोरोनाची महामारी ही अशीच मानवनिर्मित व्हायरसची महामारी असल्याचे सांगितले गेले होते. एवढेच नव्हे तर जगात कुठे ना कुठे सुरू असलेली छोटीमोठी युद्ध त्यासाठी वापरले जाणारे रासायनिक पदार्थ किंवा सामुग्री यातून प्रदूषित होणारे पर्यावरण आणि त्याचा मानवी जीवनावर होणारा वेगवेगळ्या रोग आणि आजारांचा प्रभाव दुर्लक्षित करता येत नाही.

### आगामी कृत्रिम बुद्धिमत्तेचे युग

पुढच्या वीस-पंचवीस वर्षांत आणखी एका मानवनिर्मित सुख आणि संकटाचीदेखील चाहूल लागलेली आहे. सध्या माहिती तंत्रज्ञानाच्या प्रभावाखाली मोबाईल किंवा डिजिटल युगाचा अनुभव सगळे जग घेते आहे. त्यातले लाभ किंवा फायदे उपभोगत असताना त्याच्या दुष्परिणामांचाही सामना करावा लागतो आहे. मग मोबाईलच्या अतिवापराने मेंदू निकामी होण्यापासून ते त्यापासून उद्भवणाऱ्या वेगवेगळ्या रोगांचाही प्रादुर्भाव होतो आहे. शिवाय आजच्या या इंटरनेटच्या युगात अनावश्यक माहितीचा भडीमार होत असल्याने मनुष्याच्या मनावर होत असलेले दुष्परिणाम मानवनिर्मित आपत्तीचेच निदर्शक ठरतात. येऊ घातलेली कृत्रिम बुद्धिमत्तेची लाट कसा परिणाम दाखवते, हे येणाऱ्या काळात कळेलच. परंतु सध्याच्या माहिती तंत्रज्ञानाचे ज्या पद्धतीने काही दुष्परिणाम समोर आले आहेत ते पाहता कृत्रिम बुद्धिमत्ता हा प्रकारही मनुष्याच्या कार्यक्षमतेवर परिणाम करणारा ठरू शकतो. अनेक गोष्टी तयारी स्वरूपात आणि त्याही काही क्षणात उपलब्ध होतील अशा हुबेहुब मनुष्याच्याच प्रतिकृती हे तंत्रज्ञान साकार करेल ज्यातून खरे काय आणि खोटे काय हे ओळखणेसुद्धा कठीण होणार आहे. जगाची गतिमानता वाढेल, पण मनुष्याच्या कार्यक्षमतेला तितकाच मोठा धक्का बसेल हे वास्तव नाकारता येणार नाही. विशेषतः भारतासारखी मोठी लोकसंख्या असलेल्या देशाने कृत्रिम बुद्धिमत्तेचे आगामी युग खूप सावधपणे लक्षात घेतले पाहिजे.